**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **भारत अमेरिका व्यापार करारावरून आजही लोकसभेत गदारोळ.**
2. **केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांविरोधात कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला संमिश्र प्रतिसाद.**
3. **ग्रामीण विकासासह विविध क्षेत्रांना चालना देण्यासाठी राज्य शासनाचे टाटा ट्रस्ट आणि नाम फाउंडेशन सोबत सामंजस्य करार.**
4. **पशुपक्षी, वनस्पती आणि मानव यांचे सहअस्तित्व जपणे अत्यावश्यक असल्याचं सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांचं प्रतिपादन.**

---------------------------------

**लोकसभा**

लोकसभेत आज प्रश्नोत्तराचा तास पुकारल्यानंतर सुरू झालेल्या गदारोळामुळे सभागृहाचं कामकाज आधी दुपारी बारा आणि नंतर दुपारी दोन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सभागृहाचं आजचं कामकाज सुरू झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्यानंतर लगेच विरोधी पक्ष सदस्यांनी भारत- अमेरिका व्यापार कराराविरोधात घोषणा देत हा करार आणि चार कामगार कायदे मागे घ्यावेत अशी मागणी केली. या गदारोळातच मंत्री श्रीपाद नाईक यांनी प्रश्नोत्तराच्या तासात प्रश्नाला उत्तर देण्याचा प्रयत्न केला. विरोधकांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू केल्यामुळे गदारोळ वाढत गेला. आणि पीठासीन अधिकाऱ्यांनी कामकाज तहकूब केलं. त्यानंतर सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर केंद्रीय कामगार मंत्री मनसुख मांडवीय यांनी सादर केलेल्या औद्योगिक संबंध संहिता विधेयकावर चर्चेला सुरुवात झाली. या चर्चेत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे खासदार रवींद्र वायकर, काँग्रेसचे खासदार एम के विष्णु प्रसाद यांनी भाग घेतला. दरम्यान, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात आपण हक्कभंग नोटीस दिल्याचं भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी वार्ताहरांना सांगितलं.

---------------------------------

**राज्य सभा खरगे**

ओडिशामधल्या एका अंगणवाडी केंद्रामधल्या कथित जातीय भेदभावाचा मुद्दा विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी आज राज्यसभेत शून्य प्रहरात उपस्थित केला. देशात सुधारणा आणि प्रगती होत असल्याचा दावा केला जात असताना सामाजिक भेदभावाचा प्रत्यय अशा घटनांमधून सातत्याने येत आहे, असं खरगे म्हणाले. ओदिशामधल्या या अंगणवाडीत दलित महिलेने बनवलेलं अन्न आपल्या मुलांना खायला विशिष्ट समुदायातल्या लोकांनी नकार दिल्याचं वृत्त माध्यमांमधे आलं होतं. मुलांच्या शारीरीक आणि बौद्धिक विकासामधे अंगणवाडीची भूमिका महत्त्वाची असते, तिथेच जर अशाप्रकारचा भेदभाव होत असेल तर याचा मुलांच्या वाढीवर दूरगामी परिणाम होईल, अशी भिती खरगे यांनी व्यक्त केली.

***(होल्ड बाईट- खरगे - २९ सेकंद)***

***एकवीसवीं सदी में जबकि हम बड़े बड़े सामाजिक विकास के दावे करते हैं, सामाजिक रिफॉर्म की बात करते हैं, हिंदू एक होना इसकी बात करते हैं। तो ओडिशा में एक दलित महिला हेल्पर कम कुक द्वारा तैयार भोजन को समुदाय विशेष के लोग अपने बच्चों को देने से मना कर देते हैं। इस प्रकार की घटनाएं संविधान के आर्टिकल ट्वेंटी वन ए के तहत शिक्षा के अधिकार को सीधे प्रभावित करती हैं।***

--------------------------------

**सीतारामन**

पीएम गती शक्ती सारख्या योजनांमध्ये सर्व राज्यांनी सहभागी होऊन देशाच्या विकासात हातभार लावतानाच योजनांचा लाभ घ्यावा असं आवाहन आज केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी  केलं. राज्यसभेत आज केंद्रीय अर्थसंकल्प 2026-27 वरील चर्चेला पुन्हा सुरुवात झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या. चर्चेत सहभागी होताना भाजपचे मदन राठोड यांनी भारताची अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकावर पोहोचल्याचे सांगितले. काँग्रेसचे जी.सी. चंद्रशेखर यांनी अर्थसंकल्प जनतेच्या अपेक्षांनुसार नसल्याची टीका केली. भाजपचे शंभू शरण पटेल यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत करत भारत लवकरच तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनेल, असा विश्वास व्यक्त केला. तर शिवसेना - उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रियांका चतुर्वेदी यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठी पुरेशा तरतुदी नसल्याचा आरोप करत रेल्वे सवलती पुन्हा सुरू करण्याची मागणी केली.

--------------------------------

**भारत बंद**

केंद्र सरकारच्या विविध धोरणं आणि निर्णयांच्या विरोधात प्रमुख १४ कामगार संघटनांनी पुकारलेल्या भारत बंदला आज देशाच्या विविध भागात अंशतः प्रतिसाद मिळाला. नवीन कामगार कायदे, बीज विधेयक, वीज सुधारणा विधेयक तसंच अणुऊर्जा विकास विधेयक मागे घ्यावे, विकसित भारत जी राम जी योजनेऐवजी मनरेगाचं पुनरुज्जीवन करावं या आणि इतर मागण्यांसाठी विविध कामगार संघटनांनी एकत्र येऊन आजचा बंद पुकारला आहे. काँग्रेस, समाजवादी पार्टी आणि आम आदमी पार्टीने बंदला पाठिंबा जाहीर केला आहे. महाराष्ट्रात देखील या बंद ला अंशतः प्रतिसाद मिळाल्याचं चित्र आहे. गडचिरोली, बीड, धुळे, जळगाव, नाशिक आदी शहरांत मोर्चे काढण्यात आले आणि जिल्हाधिकाऱ्यांना आपल्या विविध मागण्यांचं निवेदन सादर करण्यात आलं. अनेक राष्ट्रीयकृत बँकांमधील कर्मचारी संघटना संपात सहभागी झाल्याने काही ठिकाणी बँकामधील धनादेश वटवण्याचे व्यवहार ठप्प झाले होते.

-------------------------------

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या 'सेवा तीर्थ' आणि 'कर्तव्य भवन-१ आणि २' चे उद्घाटन करणार आहेत.नव्याने बांधलेल्या सेवा तीर्थ संकुलात पंतप्रधान कार्यालय, राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालय आणि कॅबिनेट सचिवालय असेल. कर्तव्य भवन-१ आणि २ मध्ये अर्थ मंत्रालय, संरक्षण मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, शिक्षण मंत्रालय, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, संस्कृती मंत्रालय, कायदा आणि न्याय मंत्रालय, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, रसायने आणि खते मंत्रालय आणि आदिवासी व्यवहार मंत्रालय यासह अनेक मंत्रालये असतील.

-------------------------------

**राज्य सहकार धोरण**

‘राष्ट्रीय सहकार धोरण 2025 नुसार राज्याचे सहकार धोरण ठरविण्यासाठी सहा गटांची स्थापना करण्यात आली आहे. या गटांना देण्यात आलेल्या विषयांवर त्यांचे अभिप्राय पंधरा दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश सहकार आयुक्त दिपक तावरे यांनी काढले आहेत. त्यामध्ये सहकाराचा पाया मजबूत करणे, सहकारी संस्थांना भविष्यासाठी सज्ज करणे या विषयावरील दोन गटांचे अध्यक्षपद महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनास्कर यांच्याकडे देण्यात आले आहे.

-------------------------------

**सामंजस्य करार**

टाटा ट्रस्टसोबत १२ आणि नाम फाउंडेशनसोबत एका सामंजस्य करारामुळे महाराष्ट्रातील आरोग्य, पोषण, जलसंधारण, उपजीविका आणि ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मुंबई इथं झालेल्या करारांमुळे शासकीय योजना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचणार आहेत. माता-बाल आरोग्य, कुपोषण निर्मूलन, टेलिमेडिसिन, दुर्धर आजारांवरील कमी खर्चिक उपचार आणि मुख्यमंत्री सहायता निधीला बळकटी मिळणार आहे. नाम फाउंडेशनच्या सहभागातून मराठवाडा आणि विदर्भातील जलसंधारण आणि जलयुक्त शिवार कामांना गती मिळेल. टाटा ट्रस्टच्या सहकार्याने हवामान-अनुकूल शेती, ग्रामीण उपजीविका आणि एकात्मिक ग्रामविकास साधला जाणार आहे. नोएल टाटा आणि नाना पाटेकर यांनी शासनासोबत दीर्घकालीन, परिणामकारक भागीदारीबाबत समाधान व्यक्त केलं आहे.

--------------------------------

**सरसंघचालक डॉ.मोहन भागवत**

पशुपक्षी, वनस्पती आणि मानव यांचे सहअस्तित्व पुरातन काळापासून सुरू असून ते एकाच पर्यावरणाचे घटक असल्याने हे नाते जपणे अत्यावश्यक आहे, असं प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ.मोहन भागवत यांनी केलं. इंडियन सोसायटी ऑफ ॲनिमल प्रॉडक्शन आणि नॅशनल असोसिएशन ऑफ वेटरनरी ॲनिमल रिसर्च यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूरच्या सेमिनरी हिल्स येथील पशुवैद्यकीय महाविद्यालयात तीन दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेच्या उद्घाटन सत्रात प्रमुख अतिथी म्हणून, तसेच या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी या नात्याने डॉ.भागवत बोलत होते. यावेळी व्हेटर्नरी कौन्सिल व्हावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली -

***(होल्ड बाईट - भागवत - २५ सेकंद)***

***एक अलग वेटरनरी काउंसिल वो होना चाहिए, यह अनिवार्य है, इस मत का मैं हूं। तो पशुओं के बारे में विचार करना है तो पशु चिकित्सक ही चाहिए, पशु शास्त्रज्ञ ही चाहिए। उसका सहयोग सब तरफ हो सकता है, लेकिन पशुओं का स्पेसिफिक विचार करना है तो उसमें जिनकी जानकारी उनके हाथ में बागडोर और इसलिए ऐसा काउंसिल होना चाहिए, इसके बारे में मेरा मत पूर्ण अनुकूल है।***

भटक्या कुत्र्यांबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया देताना डॉ.भागवत यांनी सुवर्णमध्य साधण्याची गरज व्यक्त

केली. कुत्र्यांच्या चावण्याच्या घटनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक असून त्यात पशुवैद्यकीय तज्ज्ञांची भूमिका महत्त्वाची असल्याचं त्यांनी सांगितलं. तसेच पशुवैद्यकीय परिषदांचं संचालन हे त्या क्षेत्रातील जाणकारांच्या माध्यमातूनच झालं पाहिजे, असंही त्यांनी स्पष्ट केलं. यावेळी इंडियन सोसायटी फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ केनाईन प्रॅक्टिसच्या स्मरणिकेचं प्रकाशन डॉ. भागवत यांच्या हस्ते करण्यात आलं.उद्घाटन सत्रात प्रास्ताविक भाषण करताना महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन पाटील यांनी विद्यापीठाच्या संशोधन आणि विस्तार उपक्रमांची माहिती दिली. इन विट्रो फर्टिलायझेशन आणि एम्ब्रियो ट्रान्सप्लांट या पशुधन गर्भधारणेच्या संशोधनात विद्यापीठाने केलेल्या उल्लेखनीय कार्याचा त्यांनी विशेषत्वाने उल्लेख केला.

--------------------------------

**सालबर्डी**

महाशिवरात्री यात्रेनिमित्त १५ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या सालबर्डी यात्रेसाठी एसटी महामंडळाने १०० अतिरिक्त बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेसद्वारे अमरावती, मोर्शी आणि वरुड येथून सुमारे ५० हजार प्रवाशांना सेवा पुरवली जाईल. या विशेष सेवेतून महामंडळाने ३० लाख रुपयांच्या अतिरिक्त उत्पन्नाचं उद्दीष्ट ठेवलं आहे. सालबर्डी यात्रा ही बहिरमनंतर अमरावती जिल्ह्यातील सर्वात मोठी यात्रा मानली जाते. या यात्रेतून दरवर्षी एसटी महामंडळाला अतिरिक्त उत्पन्न मिळते, तसेच महाराष्ट्र आणि मध्यप्रदेशातील अनेक गावांहून येणाऱ्या प्रवाशांना वाहतूक सेवा उपलब्ध होते.

--------------------------------

**सरला माहेश्वरी**

दूरदर्शनच्या माजी वृत्तनिवेदिका सरला माहेश्वरी यांचं आज निधन झालं. त्या 7० वर्षांच्या होत्या. त्यांच्या निकटवर्तीयांनी समाजमाध्यमांवर ही माहिती दिली. गेल्या काही काळापासून त्या आजारी होत्या. त्यांनी दूरदर्शनवर अनेक दशकं वृत्तनिवेदन केलं. जेव्हा खासगी वृत्तवाहिन्यांचं अस्तित्व नव्हतं अशा काळात त्यांनी आपल्या स्पष्ट शब्दफेकीनं आणि संयत सादरीकरणानं प्रेक्षकांच्या मनात घर केलं होतं.

--------------------------------

**गोवंश वाद अमरावती**

अमरावती जिल्ह्यात काल रात्री उशिरा वलगाव पोलिस स्टेशन परिसरात गोवंशावरून दोन गटांमध्ये जोरदार वाद झाला. दगडफेक आणि तोडफोड देखील करण्यात आली.

माहिती मिळताच वलगाव पोलिस घटनास्थळी पोहोचले आणि गर्दीला पांगवण्यासाठी सौम्य बळाचा वापर करून परिस्थिती नियंत्रणात आणली गेली. पोलिसांनी या परिसरात अतिरिक्त सुरक्षा तैनात केली आहे आणि पेट्रोलिंग वाढवली आहे. नागरिकांना अफवांकडे दुर्लक्ष करून शांतता राखण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

--------------------------------